MHLA160001862021

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५०/२०२१**
**मोजममियॉ वि. बाहुद्दीन व ईतर**

:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०४/०५/२०२६ ते ०८/०५/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./५१६/२०२६ तारीख २२/०४/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. फिर्यादीने संलेख पराक्रम्य अधिनियमाचे कलम १३८ च्या गुन्ह्याकरिता दि.०४/०३/२०२१ रोजी फिर्याद दाखल केली. परंतु आरोपी हा दिलेल्या पत्यावर मिळून येत नसल्याने त्यास समन्सची बजावणी झालेली नाही. त्याचप्रमाणे नोंदणीकृत डाकेने समन्स पाठवून सुध्दा त्याचा अहवाल किंवा लिफाफा परत आलेला नाही. सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. फिर्यादीने समन्स बजावण्यासाठी परिणामस्वरुपी कार्यवाही केलेली नाही. भविष्यामध्ये सुध्दा सदर समन्सची बजावणी होऊन आरोपी हजर होण्याची शक्यता दिसून येत नाही. फिर्यादीचा कसूर स्थापित झाला. त्यामुळे सदर प्रकरण गुणवत्तेवर सुध्दा अभियोग पक्षाच्या बाजुने निकाली काढता येणार नाही. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७९ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद व खारीज करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.05.06 16:11:31 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – ०६–०५–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**